**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ**
प्रकाशगड, बांद्रे (पूर्व), मुंबई - 400 051.

कामगार/ब/ककनिस/३७५८९ दिनांक ९।७।९९

## परिपत्रक

विषयः कर्मचारी कल्याण निधी

कर्मचारी व अधिकारी यांच्या पाल्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसंबंधी.

कर्मचारी कल्याण निधीतून कर्मचारी व अधिकारी यांच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीण होऊन गुणवत्ताधारक पाल्यांना रोख पारितोषिके/विशेष रोख पारितोषिके व शिष्यवृत्ती प्रदान केली जातात.

कर्मचारी कल्याण निधी समितीच्या दिनांक ५-२-९९ रोजी झालेल्या ३० व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार परिपत्रक क्रमांक कामगार विभाग/ब/ककनिस/३० वी बैठक/१००५८ दिनांक २६-२-९९ अन्वये निर्गमित केले असून स्थानिक पातळीवर संबंधित परिमंडळाचे मुख्य अभियंता यांनी उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचेशी विचार विनिमय करुन अमलबजावणी करावी असे विदित केले आहे.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, गुणवत्ताधारक पाल्यांना पुढे सलगपणे शिष्यवृत्ती देण्यासंबंधी अनावश्यक दिरंगाई होते. एकदा पारितोषिक व शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर नियमाधीन राहून त्या पाल्यास शिष्यवृत्ती पुढे चालू ठेवण्यासाठी प्रपत्र 'क' पूर्णतः सादर केल्यानंतर ज्या शैक्षणिक वर्षात पाल्य पुढील शिक्षण घेत आहे त्या शैक्षणिक वर्षाची शिष्यवृत्ती त्याच शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच अदा करणे आवश्यक आहे.

तसेच, उच्च शिक्षण घेणा-या पाल्यांचे शैक्षणिक वर्ष हे दीड वर्षाचे असेल (उदा. एम.बी.बी.एस., बी.ए.एम.एस.) अशा पात्र पाल्यांना त्यांच्या शैक्षणिक वर्षाची शिष्यवृत्ती प्रपत्र 'क' अर्जात मागील परिक्षा उत्तीर्ण किंवा त्या परिक्षेत ए.टी.के.टी. मिळवून पुढील शैक्षणिक वर्षात शैक्षणिक मंडळाच्या नियमाप्रमाणे प्रवेश दिलेला असेल त्या आधारावर देण्यात यावी.

• दुरध्वनी : 642 22 11, 642 21 31 • टेलेक्स : 011-78293/94 • फॅक्स : (022) 6443749 • तार : MUMBAIGRID.

शिष्यवृत्तीची रक्कम ज्या शैक्षणिक वर्षात पाल्य शिक्षण घेत आहे त्याच शैक्षणिक वर्षात मंजूर करुन अदा करण्याची कार्यवाही करावी.

सचिव/कर्मचारी कल्याण निधी समिती
व
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रतिः

१. ~~कार्यकारी अभियंता पर्यंतचे सर्व क्षेत्रीय अधिकारी.~~
२. सर्व क्षेत्रीय उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी.

gad/